AISSMS
COLLEGE OF ENGINEERING
ज्ञानम् सकलजनहिताय
An Autonomous Institute Affiliated with
Savitribai Phule Pune University
Accredited by NAAC with "A+" Grade | NBA - 7 UG Programmes

# OBC/VJNT/SBC (Against Cap) राऊंड मधुन प्रवेश घेतलेल्या (Only Post Matric Scholarship)योजनेसाठीच्या पात्र विद्यार्थ्यांना महत्वाची सुचना

**विषय** : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते २०२५-२६ मध्ये **OBC,VJNT,SBC** या प्रवर्गाच्या विदयार्थ्यांनी सामाईक प्रवेश प्रकिया (**Against Cap**) राऊंड मधुन प्रवेश घेतल्या सर्व विदयार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासुन ओपन कॅटेगरी प्रमाणे फुल फि भरणेबाबत.

**संदर्भ** : शुध्दीपत्रक क.१.जा.क.ससंइमाबकपुणे/भासशि/महाडीबीटी/Against Cap/२०२५-२६/२२० दिनांक :२०.०२.२०२६

वरील संदर्भिय व विषयास अनुसरून आपल्या महाविद्यालयात **SE,TE,BE (OBC,VJNT, SBC Only Post Matric Scholarship)** विदयार्थ्यांनी सामाईक प्रवेश प्रकिया(Against Cap) राऊंड मधुन प्रवेश घेतलेला आहे व जे विदयार्थी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र आहेत अशा विदयार्थ्यांनकडुन महाविदयालयात प्रवेश घेतेवेळी त्यांच्या प्रवर्गप्रमाणे फि आकारून नंतर सदर विदयार्थ्यांच्या महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्तीचे फॉर्म भरून घेतले होते. परंतु वरील मा.सहायक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण,विश्रांतवाडी,पुणे यांच्या संदर्भिय शुध्दीपत्रक क.१.नुसार ज्या **OBC,VJNT,SBC** प्रवर्गाच्या विदयार्थ्यांनी सामाईक प्रवेश प्रकिया(Against Cap) राऊंड मधुन प्रवेश घेतलेला आहे. अशा विदयार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती ही योजना लागू करणेबाबत महाराष्ट्र शासन स्तरावर मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. त्यामुळे सदर (Against Cap) राऊंड मधुन ज्या विदयार्थ्यानी प्रवेश घेतलेला आहे अश्या विदयार्थ्यांच्या शिष्यवृत्ती बाबत मा.सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, विश्रांतवाडी,पुणे यांच्याकडुन पुढील स्पष्ट निर्देश/सुचना प्राप्त होईपर्यत महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्तीचे फॉर्म भरून घेण्यासाठी स्थगिती देण्यात आली आहे.

तरी या कारणामुळे वरील संदर्भिय शुध्दीपत्रक क.१.या पत्रानुसार संबधित मा.सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, विश्रांतवाडी, पुणे व महाराष्ट्र शासनाचे पुढील स्पष्ट निर्देश/सुचना महाविदयालयास प्राप्त होईपर्यत **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते २०२५-२६ मध्ये OBC,VJNT,SBC या प्रवर्गाच्या सर्व विदयार्थ्यांनी सामाईक प्रवेश प्रकिया(Against Cap) राऊंड मधुन प्रवेश घेतलेल्या आणि शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शिष्यवृत्ती योजनेसाठीचा लाभ घेतलेल्या सर्व विदयार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये SE,TE,BE चा प्रवेश घेतेवेळी ओपन कॅटेगरी प्रमाणे फुल फि भरणे आवश्यक आहे.** याची सर्व पालक व विदयार्थ्यी यांनी नोंद घ्यावी.

Ref.No.AISSMS/COE/PRIN/ 16 /26-27
Date: 07.07.2026
सोबत:संदर्भिय शुध्दीपत्रक

AISSMS COLLEGE OF ENGINEERING PUNE-1

**Principal**
AISSMSCOE,PUNE

महाराष्ट्र शासन
सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, पुणे.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सर्व्हे नं.१०४/१०५ येरवडा पोलीस स्टेशनसमोर, विश्रांतवाडी रोड,पुणे-०६
दुरध्वनी -०२०-२९८०९९३७ Email ID -adobcpune२०२३@gmail.com

जा.क्र. ससंइमाबकपुणे/भासाशि/महाडीबीटी/Against Cap /२०२५-२६/ 220 दि.२०.०२.२०२६

## शुध्दीपत्रक

प्रति,
प्राचार्य,
अनुदानित / कायम विनाअनुदानित व्यावसायिक /
बिगर व्यावसायिक कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये (पुणे जिल्हा).

विषयः भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना सामाईक प्रवेश परिक्षाव्दारे (कॅप) प्रवेश घेतल्या असल्याबाबतच्या अटींची सक्ती न करणेबाबत.

संदर्भ: १. इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे शासनपत्र शिष्यवृत्ती-१७/प्र.क्र.१३/शिक्षण दि.०१.०६.२०२०
२. इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. शिवृत्ती-२०२३/ प्र.क्र.८३/शिक्षण दिनांक : २० जून, २०२५
३. या कार्यालयाचे पत्र क्र.१०९६ दि.२९.०८.२०२५

उपरोक्त विषयास अनुसरून, संदर्भिय शासनपत्र क्र.१ अन्वये ज्या विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना देखील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी सामाईक प्रवेश परीक्षेची (कॅप) सक्ती करण्यात येऊ नये असे कळविले आहे.

त्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ मधील शासन पत्रास अनुसरून या कार्यालयाकडिल संदर्भिय पत्र क्र.३ अन्वये यापुर्वी कळविण्यात आले होते की, "भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Post Matric Scholarship) योजनेसाठी विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गातील तंत्रशिक्षणाशी निगडीत पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी या योजनेचा लाभ ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतला आहे, अशाच विद्यार्थ्यांना लागू राहील. याशिवाय सदर प्रवेश प्रकिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर (Against Cap) प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना (उत्पन्न मर्यादा २.५ लक्ष) देखील सदर योजनेचा लाभ

घेता येईल. सदर बाब केवळ भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Post Matric Scholarship) साठी लागू आहे."

परंतू संदर्भ क्र.३ मधील शासन निर्णयातील परिशिष्ट ब मधील मुद्दा क्र. १४ अन्वये "सदर योजनेचा लाभ राज्य शासनाच्या अथवा तत्सम प्राधिकृत यंत्रणेच्या केवळ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारेच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील. तसेच मान्यताप्राप्त महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतला असल्यास व सदर अभ्यासक्रमाच्या शुल्क रचनेस राज्य शासनाच्या शिक्षण शुल्क समितीची मान्यता प्राप्त असल्यासच लाभ देय राहील. कोणत्याही अभ्यासक्रमास व्यवस्थापन कोटा, एनआरआय कोटा तसेच स्पॉट ॲडमिशन प्रक्रिया इत्यादी अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देय राहणार नाही." असे नमूद केलेले आहे.

त्यामुळे शासनाची केंद्रीभुत प्रवेश प्रकिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर (Against Cap) प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Post Matric Scholarship) ही योजना लागू करणेबाबत शासन स्तरावर मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. शासन स्तरावरून पुढील स्पष्ट निर्देश/सुचना प्राप्त होईपर्यंत संदर्भ क्र.३ मधील पत्र रद्द समजण्यात यावे.

सबब सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Post Matric Scholarship) योजनेंतर्गतर अर्ज सादर करताना संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयातील अटी व शर्तीचे काटेकोर पालन करून अचित कार्यवाही अनुसरण्यात यावी.

(प्रदिप संकपाळ)
सहायक संचालक
इतर मागास बहुजन कल्याण पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१. मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण, (प्रादेशिक) विभाग पुणे.